स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

यशस्वी १९ वर्ष

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट




## थोडक्यात



### संतोष देशमुख यांच्या हत्येवर बोलताना बजरंग सोनवणेंचे डोळे पाणावले!

बीड : जिल्ह्यातील मस्साजोग या गावातील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर राज्यातील वातावरण पेटले आहे. देशमुख यांच्या हत्येचा मुद्दा थेट विधिमंडळात उपस्थित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात जे कोणी सामील असतील, त्यांना सोडले जाणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. असे असताना बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे मस्साजोग गावात गेल्यानंतर भावुक झाले आहेत. संतोष देशमुख यांच्या मुलीचे नाव काढताच त्यांचा कंठ दाटून आला आहे.

### हिवाळी अधिवेशन राष्ट्रगीताने संस्थगित

नागपूर, : विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. पुढील अधिवेशन सोमवार, दि. 3 मार्च 2025 रोजी विधानभवन, मुंबई येथे होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेत सभापती प्रा. राम शिंदे यांनी केली. विधानपरिषदेत प्रत्यक्षात 36 तास कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज 6 तास झाले. या अधिवेशनात सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती 87.76 टक्के होती, तर एकूण सरासरी उपस्थिती ही 79.30 टक्के इतकी होती. विधानपरिषदेत पुन:स्थापित 4 शासकीय विधेयके मांडण्यात आली असून 4 विधेयके संमत झाली. विधानसभेने परित करून विधानपरिषदेत आलेली विधेयके 9 आहेत.

# बीडमधील 'आगाव'पणा! मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन विनाविलंब कारवाई करावी!!

● अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त देशमुख यांनी केली मुख्यमंत्र्यांकडे विनाविलंब कारवाईची मागणी

**माध्यमांवर कोणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर उभ्या महाराष्ट्रात ठीक ठिकाणी आवाज उठवला जाईल!**

### बीडमध्ये चाललंय काय? बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था स्थिती अस्तित्वात आहे की नाही? असा सवाल देशमुख यांनी केला उपस्थित

### श्रीमती आघाव यांच्या अरेरावी मुळे माध्यम जगतात संताप! आघाव यांच्यावर कठोर कारवाई व्हावी : राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे

### बीडमधून नकारात्मक बातम्या थांबता थांबत नसतानाच संपादकाला महिला कर्मचाऱ्याने धमकी दिल्याने संताप



**बीड (प्रतिनिधी) मस्साजोगमधील घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. या घटनेचे तीव्र पडसाद उभ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दिसून आली. या घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश गृहखात्याला दिलेले असताना बीडमधून येणाऱ्या नकारात्मक बातम्या थांबता थांबत नाहीत. बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक सिरसाट यांना गौण खनिज विभागातील आघाव नावाच्या महिला कर्मचाऱ्याने धमकी दिल्याचे प्रकरण पुढे आले आहे. त्यामुळं बीडमध्ये चाललंय काय? बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था स्थिती अस्तित्वात आहे की नाही? असा सवाल उपस्थित करीत अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संबंधित महिला कर्मचाऱ्यावर विनाविलंब निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी केली आहे.**

#### माध्यमांवर दहशत निर्माण करणे संतापजनक व निषेधार्थ : एस. एम. देशमुख

■ पुणे येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये राज्यातील ज्येष्ठ संपादक, पत्रकार उपस्थित होते. या बैठकीमध्ये एस. एम. देशमुख यांनी बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचारी आघाव यांनी दिलेल्या धमकीचा तीव्र निषेध व्यक्त केला. 'बीड जिल्हयातील सामांन्य माणूस दहशतीखाली आहे आता माध्यमांवर देखील दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, हे संतापजनक आणि निषेधार्थ आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची दखल घेऊन आघाव यांच्यावर कारवाई करावी', अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केली आहे.

#### आघाव यांच्यावर कठोर कारवाई व्हावी : राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे



■ बीड येथील दैनिक 'वास्तव'चे संपादक तथा डिजिटल मिडिया परिषदेचे पदाधिकारी जितेंद्र शिरसाठ यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी श्रीमती आगाव यांनी दूरध्वनीवरून फोन करून अर्वाच्य भाषेत धमक्या दिल्या, तू तातडीने येऊन मला भेट अन्यथा तुला उचलून आणण्याची मला व्यवस्था करावी लागेल अशी अरेरावीची भाषा वापरली. जितेंद्र सिरसाट यांनी जिल्ह्यातील अवैध खनिज उत्खनन विभागा संबंधी बातमी छापली होती. श्रीमती आघाव यांच्या अरेरावी मुळे जिल्ह्यातील माध्यम जगतात संताप व्यक्त होत आहे. आघाव यांच्यावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केली आहे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून संतोष देशमुख यांच्या परिवाराचे सांत्वन

बीड : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकयांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे. याप्रकरणी दोषी व्यक्तींना ाशी दिली जाईल यासाठी मी स्वत: या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे, अशी ग्वाही देतो असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. मस्साजोग येथे देशमुख कुटुंबियांच्या सांत्वन भेटप्रसंगी ते बोलत होते. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले. शासनाच्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो असे श्री. पवार म्हणाले. पोलीस आपल्या पद्धतीने तपास करीत आहेत सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून यात कुठलीही त्रुटी राहणार नाही. यावेळी श्री. पवार यांच्या समवेत रमेश आडसकर, डॉ. योगेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.





केज : तालुक्यातील मस्साजोग येथील येथील सरपंच स्व. संतोष अण्णा देशमुख यांच्या कुटुंबियांची राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, कल्याण आखाडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांची उपस्थिती होती.

## आयपीएस नवनीत कॉंवत आता बीडचे नवे 'एसपी'



बीड : जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांची मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात कुचराई केल्याने बदली करण्यात आल्याने त्यांच्या जागी छत्रपती संभाजीनगर येथील पोलिस उपआयुक्त, आयपीएस अधिकारी नवनीत कॉंवत यांची नियुक्ती करण्यात आली. देशमुख यांच्या हत्या प्रकरणात कुचराई केल्यामुळे केजचे फौजदार राजेश पाटील यांचे निलंबन तर पोनि. प्रशांत महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठविले. या प्रकरणात मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष घातले. कॉंवत यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाचे अवर सचिव संदीप ढाकणे यांनी शनिवारी काढले आहेत. जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान गुन्हेगारी रोखून जनसामान्यांमध्ये पोलिसांबद्दल पुन्हा विश्वास निर्माण करण्याचे मोठे आव्हान कॉंवत यांच्या समोर आहे. देशमुख खून प्रकरणातील उर्वरित ३ आरोपी जेरबंद करणे, गोळीबाराच्या घटनांचा तपास, गुटखा, वाळू तस्करी, खून, चोऱ्या, आदी गुन्हे रोखण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

**कोण आहेत नवनीत कांवत?** ● पान ३ वर...



## कोणाचा नंबर लागेल याचा नेम नाही! धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी

मस्साजोगचे ग्रामस्थांनी शरद पवारांसमोर मांडली कैफियत

मस्साजोग : आम्ही सगळे भयभीत आहोत, आमच्यातून उद्या कुणाचा नंबर लागेल याचा नेम नाही, म्हणून मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला आधार द्यावा, अशी मागणी मस्साजोग येथील ग्रामस्थांनी शनिवारी खासदार शरद पवार यांच्याकडे केली. कैफियत मांडताना सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी आणि बंधू धनंजय देशमुख यांना अश्रू अनावर झाले. ● पान ३ वर...

**बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील धमकी देणाऱ्या महिला कर्मचाऱ्यावर कारवाई**

● वडवणीत पत्रकारांची तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना मागणी

# जितेंद्र सिरसाट धमकीची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी दखल घ्यावी!

वडवणी : प्रतिनिधी

बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याने बातमी का टाकली या कारणाने धमकी दिली. एवढेच नाही तर उचलून नेण्याची भाषा केली. सदर अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी आणि बीड जिल्ह्यातील पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी वडवणी येथील पत्रकारांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांच्याकडे केली आहे.

वडवणी येथील पत्रकारांनी वडवणीचे तहसीलदार कार्यालयात तहसीलदार विनायक दिवटे तसेच पोलीस ठाणे मार्फत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना मागणी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ यांनी मागील पंचवीस वर्षाच्या पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजुरांना न्याय मिळवून देण्याची भूमिका बजावली आहे. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे असलेले जितेंद्र सिरसाट यांनी कधीही चुकीच्या बातम्या छापलेल्या नाहीत. लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी कधी कधी अधिकाऱ्यांची नाराजी घेतलेली आहे. मात्र त्यांना या पद्धतीने धमकी देऊन आवाज दाबण्याचा प्रयत्न करणे हे चुकीचे आहे. वडवणी येथील पत्रकारांनी शनिवारी सकाळी निवेदन देऊन त्या ठिकाणी भावना व्यक्त केल्या. यावेळी पत्रकार अशोक निपटे यांनी बोलताना सांगितले की जितेंद्र सिरसाट हे अत्यंत सत्यवादी आणि न्यायप्रिय पत्रकार आहेत. त्यांच्यावर या पद्धतीने धमकी दिली जात असेल तर जिल्ह्यातील सर्वसामान्य पत्रकारांना पत्रकारिता करावी का नाही हा प्रश्न पडला आहे. यावेळी पत्रकार विनायक जाधव यांनी लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांना धमकी देणाऱ्यावर कारवाईची मागणी केली. पत्रकार सतीश वाघमारे यांनी पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत कारवाई करून सदर अधिकाऱ्याला निलंबित करावे अशी मागणी केली. धमकी देणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करण्याची मागणी यावेळी नव युवक पत्रकार प्रकाश उजगरे यांनी केली. पत्रकार लहू खारगे यांनी अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली तर प्राध्यापक श्रीनिवास काकडे यांनी पत्रकाराला उचलून नेण्याची भाषा करणाऱ्या महिला अधिकाऱ्याचा जाहीर निषेध व्यक्त करून निलंबनाची मागणी केली. यावेळी पत्रकार

#### अन्यथा वडवणी तहसीलवर मोर्चा काढू.. साळवे

■ भ्रष्टाचार उघडा करणारे पत्रकार जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई होणे गरजेचे आहे येत्या दोन दिवसात सदर अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झाली नाही अथवा गुन्हे दाखल झाले नाहीत तर आम्ही भालेराव मित्र मंडळाच्या वतीने वडवणी तहसील कार्यालयावर निदर्शने करु व मोर्चा काढू असा इशारा भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी दिला



रामेश्वर गोंडे, भैय्यासाहेब तांगडे, सतीश वाघमारे, अशोक निपटे, विनायक जाधव, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार लहू खारगे, श्रीनिवास काकडे, अर्जुन मुंडे, जोतीराम कलेढोण, विनोद काकडे, प्रकाश उजगरे यांच्यासह भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे व त्यांचे कार्यकर्ते यांचीही उपस्थिती होती.

## त्यांच्या वाणीतून....

कल्याण येथील सोसायटीमध्ये मराठी माणसांवर झालेल्या हल्ल्या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. मुंबई ही मराठी माणसांची अस्मिता आहे. कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाहील

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

लॉजिस्टिक्स क्षेत्रांत सुधारणा करण्यासाठी उद्योगजगताने सरकारी डिजिटल मंचांमध्ये 100 टक्के सहयोग साधणे आवश्यक आहे.

– उद्योगमंत्री पीयूष गोयल

## इतिहासात आजचा दिवस_22 डिसेंबर

अंतरराष्ट्रीय

1939– दारूगोळ्याच्या कारखान्यात काम करणया स्त्रियांनी पुरुषांप्रमाणेच पगार व सर्व सोयी मिळाव्यात, अशी इंग्लंडच्या मजूरमंत्र्यांकडे मागणी केली.

1944– म्यूज नदीच्या परिसारातील जर्मन सैन्यांची माघार, फिलिपिन्समधल्या लीट बेटावरून जपानी सैन्यांची माघार.

1945– युगोस्लाव्हियातील टिटो यांच्या राजवटीस इंग्लड व अमेरिकेची मान्याता.

राष्ट्रीय

2004– बेस्ट बेकरी खटल्यातील प्रमुख साक्षीदार जहिराने साक्ष बदलण्यासाठी 18 लाख रुपये घेतल्याचा 'तहलका' चा आरोप.

2006– पाटण्याच्या एका जलद न्यायालयाने हत्याच्या एका प्रकरणात 17 लोकांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

2007 – भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज झहीर खान वर्ष 2007 मध्ये एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला. सर्वाधिक धावा जमवणाया खेळाडूंच्या यादीत महान भारतीय फलंदाज सचिन तेंडुलकरने दुसरा स्थान पटकावला. झहीरने 33 एकदिवसीय सामन्यात 40 बळी घेतले तर सचिनने तेवढ्याच सामन्यात 1425 धावा जमवल्या.

जन्म

1723– जेम्स वुल्फ या ब्रिटिश सेनानीचा जन्म त्याने कॅनडामध्ये ब्रिटिश सत्ता प्रस्थापित केली आणि्रेंचांना हाकलून लावले.

1853– रामकृष्ण परमहंस यांची पत्नी शरदामाता यांचा जन्म.

1887– जागतिक कीर्तीचे भारतीय गणिती श्रीनिवास रामनुजन अय्यंगार यांचा जन्म.

1958– डॉ. आंनद नाडकर्णी यांचा जन्म वैद्यकीय लेखनामुळे ते प्रसिद्ध आहेत.

निधन

1943– पीटर, रॅबिट्, जेमिमा पुडलडक अशा पात्रांची निर्मिती करून बालवाचकांची लाडकी लेखिका बनलेल्या बिअट्रिक्स पॉटर या लेखिकेचे निधन.

1945– शीघ्रकवी श्ररधर बाळकृष्ण कुलकर्णी ऊफर् पठ्ठे बापूराव या लावणीसम्राटाचे निधन. 2001– अफगाणिस्तानामध्ये महमद करझाईंनी सत्ताग्रहण केले.

1975– प्रसिद्ध संगीतकार वसंत देसाई यांचा लिफ्टमध्ये अडकून मृत्यू.

2006– जम्मू–कााश्मिरचे मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांचे ज्येष्ठ बंधू गुलाम कादिर भट यांचे हज यात्रेच्या दरम्यान सौदी अरेबियातील मक्का शहरात हृद्यविकाराच्या धक्क्याने निधन.

2007 – ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक मोतीलाल शहा यांचे वयाच्या 83 व्या वर्षी दीर्घकालीन आजाराने निधन.

## गुरु वचन

# आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई–वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.

जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु–संत व महापुरुषांनी आई–वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे.

भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई–वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई–वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई–वडिलांचा सांभाळ किंवा पालन–पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई–वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई–वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई–वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई–वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई–वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई–वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई–वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई–वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई–वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई–वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार–प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल.

श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई–वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई–वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते.

त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे 80 हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकाऱ्याचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.


आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई–वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

# पंतप्रधानांसोबत सर्वात जास्त कोणी केले काम, कोणासोबत होते मतभेद, 15 राष्ट्रपतींबद्दल 15 मनोरंजक गोष्टी

आज द्रौपदी मुर्मू देशाच्या 15व्या राष्ट्रपती होणार आहेत. मुर्मू यांच्यापूर्वी 14 व्यक्तींनी देशातील सर्वोच्च घटनात्मक पद भूषवले आहे. त्याच वेळी, रामनाथ कोविंद हे देशाचे 14 वे राष्ट्रपती आहेत, ज्यांनी आपला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. देशाचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद हे एकमेव महामहिम आहेत, ज्यांनी सलग दोन वेळा हे पद भूषवले होते.








**1. राजेंद्र प्रसाद :**

● देशाचे पहिले राष्ट्रपती असलेले राजेंद्र प्रसाद हे एकमेव राष्ट्रपती आहेत, ज्यांनी सलग दोन वेळा आपला कार्यकाळ पूर्ण केला होता. सर्वाधिक काळ पदावर राहण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. त्यांनी 26 जानेवारी 1950 रोजी पदभार स्वीकारला आणि 12 वर्षे 107 दिवस म्हणजे 13 मे 1962 पर्यंत ते राष्ट्रपती होते.

**2. सर्वपल्ली राधाकृष्णन :**

● सर्वपल्ली राधाकृष्णन हे देशाचे दुसरे राष्ट्रपती होते. राधाकृष्णन हे पहिले राष्ट्रपती आहेत, ज्यांनी उपराष्ट्रपतीपदही भूषवले होते. राधाकृष्णन यांनी 1962 ते 1967 या काळात हे पद भूषवले होते.

**3. झाकीर हुसेन :**

● देशाला तिसरे राष्ट्रपती म्हणून झाकीर हुसेन मिळाले. झाकीर हे पहिले राष्ट्रपती होते, जे त्यांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. झाकीर यांच्या नावावर सर्वात कमी कार्यकाळ राहण्याचा विक्रम आहे. याशिवाय ते पहिले राष्ट्रपती आहेत, ज्यांचे पदावर असताना निधन झाले. झाकीर यांच्या नावावर देशाचे पहिले मुस्लिम राष्ट्रपती होण्याचा विक्रमही आहे.

**4. व्हीव्ही गिरी :**

● देशाचे असे पहिले राष्ट्रपती होते, ज्यांनी कार्यवाहक राष्ट्रपती म्हणूनही काम केले होते. सत्ताधारी पक्षाचे अधिकृत उमेदवार नसतानाही विजयी झालेले गिरी हे पहिले राष्ट्रपती होते. सर्वात कमी फरकाने जिंकण्याचा विक्रम गिरी यांच्या नावावर आहे.

**5. फकरुद्दीन अली अहमद :**

● फकरुद्दीन अली अहमद यांच्या कार्यकाळात देशात आणीबाणी घोषित करण्यात आली होती. अहमद हे दुसरे राष्ट्रपती होते, ज्यांचा पदावर असताना मृत्यू झाला.

**6. नीलम संजीव रेड्डी :**

● सर्वात तरुण राष्ट्रपती होण्याचा विक्रम नीलम संजीव रेड्डी यांच्या नावावर आहे. वयाच्या 64 वर्षे दोन महिन्यांत त्यांनी पदभार स्वीकारला. मात्र, द्रौपदी मुर्मू यांनी शपथ घेताच हा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला जाईल. मुर्मू वयाच्या 64 व्या वर्षी एक महिना पाच दिवस शपथ घेणार आहेत. याशिवाय बिनविरोध निवडून आलेले ते पहिले राष्ट्रपतीही होते.

**7. ग्यानी झैल सिंग :**

● देशाचे सातवे राष्ट्रपती झैल सिंग यांच्याकडे पहिले शीख राष्ट्रपती होण्याचा विक्रम आहे. झैल सिंग हे राष्ट्रपती आहेत, ज्यांच्या कार्यकाळात देशाने पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्यातीस संघर्ष सतत पाहिला.

**8. रामास्वामी वेंकटरामन :**

● चार पंतप्रधानांसह सेवा करणारे पहिले राष्ट्रपती बनले. आधी राजीव गांधी, नंतर व्हीपी सिंह, चंद्रशेखर आणि पीव्ही नरसिंह राव हे पंतप्रधान होते. यापैकी तीन पंतप्रधानांचीही नियुक्ती करण्यात आली होती. वेंकटरामन यांच्या नावावर सर्वात वयस्कर राष्ट्रपती होण्याचा विक्रम आहे. वयाच्या 76 वर्षे सात महिने 21 दिवसांनी त्यांनी शपथ घेतली.

**9. शंकर दयाळ शर्मा :**

● वेंकटरामन यांच्यानंतर शंकर दयाळ शर्मा हे दुसरे राष्ट्रपती होते, ज्यांनी चार पंतप्रधानांसोबत काम केले होते. यापैकी त्यांनी आपल्या कार्यकाळाच्या शेवटच्या वर्षात तिघांची नियुक्ती केली. अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्याचे प्रकरणही त्यांच्याच कार्यकाळात घडले.

**10. केआर नारायणन :**

● देशाचे पहिले दलित राष्ट्रपती होण्याचा विक्रम केआर नारायणन यांच्या नावावर आहे. आतापर्यंतच्या सर्वात जुन्या राष्ट्रपतींपैकी ते एक होते. आतापर्यंत 76 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या तीन राष्ट्रपतींनी शपथ घेतली आहे.

**11. डॉ. एपीजे अब्दुल कलाम :**

● कलाम हे पहिले राष्ट्रपती होते, जे देशाचे महान शास्त्रज्ञ होते. पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे पहिले मुस्लिम राष्ट्रपती होते.

**12. प्रतिभा देवी पाटील :**

देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा विक्रम प्रतिभा देवी सिंह पाटील यांच्या नावावर आहे.

**13. प्रणव मुखर्जी :**

● राष्ट्रपतीपद भूषवणारे पहिले बंगाली. 25 जुलै 2012 रोजी प्रणव मुखर्जी देशाचे राष्ट्रपती झाले. प्रणव मुखर्जी यांचा जन्म 11 डिसेंबर 1935 रोजी बंगाल प्रेसिडेन्सी येथे झाला. ते देशाचे दुसरे सर्वात वयस्कर राष्ट्रपती होते. मुखर्जी यांनी वयाच्या 76 वर्षे सात महिने 14 दिवसांनी पदभार स्वीकारला. त्याच वेळी, जेव्हा सर्वात वयस्कर राष्ट्रपती आर वेंकटरामन यांनी पदभार स्वीकारला, तेव्हा ते 76 वर्षे सात महिने 21 दिवसांचे होते.

**14. रामनाथ कोविंद :**

● कोविंद हे पहिले राष्ट्रपती आहेत, जे भारतीय जनता पार्टी आणि ीएए चे सदस्य होते. 25 जुलै 2017 रोजी रामनाथ कोविंद यांच्या रूपाने देशाला दुसरे दलित राष्ट्रपती मिळाले. उत्तर प्रदेशात जन्मलेले पहिले राष्ट्रपती म्हणून त्यांची नोंद आहे.

**15. द्रौपदी मुमू :**

● आदिवासी समाजातून आलेल्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती. दुसया महिला राष्ट्रपती. तसेच ओडिशातून आलेल्या पहिल्या राष्ट्रपती म्हणून त्यांची नोंद झाली आहे.

# या श्रेणीत हार्टरेट राहीला तर कमी असेल अटॅक येण्याचा धोका, जास्त असल्यास बिघडू शकते आरोग्य

आजच्या काळात हृदयाच्या आरोग्याची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. असे केल्याने हृदयविकारासह अनेक हृदयविकार टाळता येतात. हृदय तंदुरुस्त ठेवण्यासाठी शरीरातील रक्ताभिसरणही सुरळीत असले पाहिजे. यासाठी हृदय गती योग्य असणे देखील आवश्यक आहे.





तुमचे हृदय एका मिनिटात किती वेळा धडकते याला हृदय गती म्हणतात. त्याची उच्च आणि निम्न दोन्ही परिस्थिती धोकादायक मानली जाते. हृदयाचे ठोके वाढणे हे देखील हृदयविकाराच्या झटक्याचे लक्षण असू शकते.

यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो आणि छातीत दुखू शकते. अशा परिस्थितीत, आपल्या शरीरातील सामान्य हृदय गती किती असावी हे जाणून घेणे र महत्वाचे आहे.

हृदयरोगतज्ज्ञ स्पष्ट करतात की हृदयाच्या ठोक्यांची सामान्य श्रेणी 60 ते 100 च्या दरम्यान असावी. औषधे घेणाया काही लोकांमध्येही ते कमी होते.

16 ते 30 वयोगटातील लोकांमध्ये ते 80 च्या आसपास राहते आणि 30 ते 55 मधील 74 असावे. यापेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये, श्रेणी 70 ते 75"इश् पर्यंत कमी केली जाऊ शकते. लहान मुलांमध्ये म्हणजेच 2 ते 11 वर्षांमध्ये ही श्रेणी 70 ते 120 पर्यंत असू शकते.

तज्ज्ञांच्या मते, हृदय गती वाढण्याची अनेक कारणे असू शकतात, हे हृदयविकाराचे लक्षण असू शकते. हे हृदयविकाराचा झटका किंवा अशक्तपणाचे देखील लक्षण आहे. ही समस्या लहान मुलांमध्ये कमी आहे, परंतु आजकाल 30 ते 50 वर्षे वयोगटातील अधिक प्रकरणे आहेत.

हृदयाचे ठोके सामान्य नसल्यास, श्वासोच्छ्वास, हृदयविकाराचा झटका यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. म्हणून, हृदयाचे ठोके सामान्य श्रेणीत नसल्यास, आपण डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

काही प्रकरणांमध्ये हृदयाची धडधड कधीकधी वाढते. जसे की खेळताना किंवा नाचताना पण हृदयाचे ठोके सामान्य स्थितीतही वाढत असतील, तर ते धोक्याचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत तुम्ही अजिबात गील राहू नये.

# प्रचंड वादळानंतर संसदेचे हिवाळी अधिवेशन संस्थगित, सात विधेयके मंजूर

नवी दिल्ली, : संसदेचे हिवाळी अधिवेशन शुक्रवार, 20 डिसेंबर, 2024 रोजी अनिश्चित काळासाठी संस्थगित झाले. सोमवारी, 25 नोव्हेंबर, 2024 रोजी हे अधिवेशन सुरू झाले होते. 26 दिवस चाललेल्या या अधिवेशनात लोकसभेच्या 20 आणि राज्यसभेच्या 19 बैठकांचे कामकाज झाले.

या अधिवेशनादरम्यान, लोकसभेत 05 विधेयके मांडण्यात आली. लोकसभेत 4 विधेयके आणि राज्यसभेत 3 विधेयके संमत करण्यात आली. ''भारतीय वायुयान विधेयक, 2024'' हे विधेयक या अधिवेशनात दोन्ही सभागृहांनी मंजूर केले.

विमान कायदा, 1934 मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांमुळे अंतर्भाव वगळणेरद्द करणे यांसंदर्भात निर्माण झालेली अस्पष्टता दूर करून हा कायदा पुन्हा लागू करण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे.

आपल्या देशाने आपल्या संविधानाचा स्वीकार करण्याच्या ऐतिहासिक घटनेचा 75 वा वर्धापन दिन 26 नोव्हेंबर 2024 रोजी साजरा केला. उद्देशिका, आपले संविधान जाणून घ्या, संविधानाची निर्मिती आणि त्या दिवशी त्याच्या वैभवाचा गौरव साजरा करणे या चार संकल्पना अंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात 26 नोव्हेंबर 2024 रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री, विरोधी पक्षनेते, दोन्ही सदनांचे सदस्य आणि मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रपतींच्या हस्ते एक स्मृती नाणे, टपाल तिकीट आणि ''मेकिंग ऑफ द कॉन्स्टिट्युशन ऑ\ इंडिया अँड इट्स ग्लोरियस जर्नी'' आणि ''मेकिंग ऑफ द कॉन्स्टिट्युशन ऑ\ इंडिया : ए ग्लीम्स'' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

जगभरातील भारतीय भारताच्या राष्ट्रपतींसोबत उद्देशिका वाचनात सहभागी झाले.

संविधान स्वीकृतीच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त वर्षभर चाललेल्या सोहळ्याचा एक भाग म्हणून, 13 आणि 14 डिसेंबर रोजी लोकसभेत आणि 16 आणि 17 डिसेंबर 2024 रोजी राज्यसभेत ''भारतीय संविधानाच्या 75 वर्षांचा गौरवशाली प्रवास'' या विषयावर विशेष चर्चा आयोजित करण्यात आली होती .लोकसभेत ही चर्चा 15 तास 43 मिनिटे चालली ज्यामध्ये 62 सदस्यांनी भाग घेतला आणि त्याला पंतप्रधानांनी उत्तर दिले.

राज्यसभेत एकूण 17 तास 41 मिनिटांची चर्चा झाली ज्यामध्ये 80 सदस्यांनी भाग घेतला आणि त्याला गृहमंत्र्यांनी उत्तर दिले .2024–25 च्या अनुदानासाठी पुरवणी मागण्यांच्या पहिल्या भागावर चर्चा झाली आणि त्यावर मतदान झाले संबंधित विनियोजन विधेयक सादर करण्यात आले, चर्चा करण्यात आली आणि सुमारे 7 तास 21 मिनिटांच्या चर्चेनंतर 17–12–2024 रोजी लोकसभेत संमत करण्यात आले. घटनादुरुस्ती (एकशे एकोणतीसावी) विधेयक, 2024 आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयक, 2024 ही दोन ऐतिहासिक विधेयके लोकसभा आणि राज्येकेंद्रशासित प्रदेश विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या यंत्रणेला प्रभावी करण्यासाठी ''एक राष्ट्र, एक निवडणूक'' या संकल्पनेखाली 17 डिसेंबर 2024 रोजी लोकसभेत सादर करण्यात आली आणि 20 डिसेंबर 2024 रोजी संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्यात आले .लोकसभेत सादर करण्यात आलेली, लोकसभा राज्यसभेत संमत करण्यात आलेली आणि दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांची यादी परिशिष्टात जोडली आहे.

लोकसभेच्या कामकाजाची उत्पादकता अंदाजे 54.5 टक्के आणि राज्यसभेची उत्पादकता 40 टक्के होती.

**18 व्या लोकसभेच्या तिसया आणि राज्यसभेच्या 266 व्या सत्रात झालेले संसदीय कामकाज :**

1. लोकसभेत सादर झालेली विधेयके

किनारपट्टी नौवहन विधेयक, 2024, मर्चंट शिपिंग विधेयक, 2024, घटनादुरुस्ती( एकशे एकोणतीसावी) विधेयक, 2024

केंद्रशासित प्रदेश कायदा( सुधारणा) विधेयक 2024, विनियोजन विधेयक(क्र. 3), 2024

**संसदेच्या सभागृहांची संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवण्यात आलेली विधेयके :**

1.घटनादुरुस्ती (एकशे एकोणतीसावी) विधेयक, 2024., 2.केंद्रशासित प्रदेश कायदा( सुधारणा) विधेयक 2024, लोकसभेने संमत केलेली विधेयके बँकिंग कायदे( सुधारणा) विधेयक, 2024, रेल्वे( सुधारणा) विधेयक, 2024, आपत्ती व्यवस्थापन( सुधारणा) विधेयक, 2024, विनियोजन( क्र.3) विधेयक, 2024, राज्यसभेने संमत केलेली विधेयके, तेलक्षेत्र( नियमन आणि विकास) सुधारणा विधेयक, 2024, भारतीय वायुयान विधेयक, 2024, बॉयलर्स विधेयक, 2024, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेली विधेयके भारतीय वायुयान विधेयक, 2024

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

वि शे ष





## परभणी घटनेच्या निषेधार्थ पैठण तहसीलसमोर सर्व पक्षीय ठिय्या आंदोलन

**पैठण, सर्जेराव खडसन**

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची झालेली विटंबना तसेच पोलिस कोठडी दरम्यान आंदोलक भीम सैनिक सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांचा मृत्यु व केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ दि.(२०) शुक्रवार रोजी तहसील कार्यालयासमोर पैठण तालुक्यातील सर्व पक्षाच्या तसेच समाज बांधवांच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

आंदोलकांनी केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत तब्बल तीन तास ठिय्या आंदोलन करून तीव्र निषेध व्यक्त केला. परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर या घटनेच्या विरोधात आंदोलन करणारे आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणी मुळे पोलीस कोठडीत मृत्यु झाला त्यांच्या मृत्युची CBI मार्फत चौकशी करून त्यांच्या कुटुंबास आर्थिक मदत म्हणुन एक कोटी रुपये देण्यात यावे.

### प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे

सदरील प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे .त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नौकरीत सामाविष्ट करून घेण्यात यावे. यामागणी सोबतच पोलीस कोठडीत आंदोलक सोमनाथ सुर्यवंशी यांना ज्या पोलीसांनी मारहाण केली त्यांची नार्को टेस्ट करून दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर तात्काळ सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करत त्यांचे कायम निलंबन करण्यात यावे. तसेच भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणारा आरोपी मनोरुग्ण असल्याचा अहवाल देणाऱ्या डॉक्टरांची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच पोलिसांकडून आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्यावे व या आंदोलना दरम्यान गंभीर जखमी झालेल्या आंदोलकांना आर्थिक मदत देण्यात यावी .आदिं मागण्यांचे निवेदन पैठण तहसिल कार्यालयाला देण्यात आले.

सदरील निवेदन नायब तहसीलदार बनसोडे यांनी स्वीकारले. यावेळी दशरथ आडसुळ, राजु गायकवाड, जगन्नाथ साळवे, नंदकिशोर मगरे, रावसाहेब आडसुळ, बाबासाहेब गायकवाड, संजय खडसन, पाथ्रीकर, सोमनाथ निकाळजे, अँड. सुभाष खडसन, प्रमोद सरोदे, कल्याण मगरे, भारत आठवले, प्रकाश पवार, ज्ञानदेव आडसुळ, गौरव आठवले, पंकज गायकवाड, राजु चाबुकस्वार, लखन कांबळे, गौतम सोनवणे, मयूर, विष्णु खंडागळे, रितेश पहिलवान, वाल्हूल प्रकाश पवार, किरण घाटविसावे इस्माईल इनामदार रवी गायकवाड, देवा अहिरे, नंदू गरुटे, पपू पहिलवान, सुरेश सदावर्ते, कोल्हे, म्हस्के, बनसोडे, गिरी, पहिलवान यांच्या सह महीला भगिनी व सर्व समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या आंदोलना दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा मोठा चोख बंदोबस्त तैनात करण्यात होता.

## घटनेचा राज्यभरातून तिव्र संताप व्यक्त: संपादक जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणाऱ्या महिला कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी

# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पोलीस स्टेशनला निवेदन; मास्टरमाईंड शोधा!

### पत्रकारांच्या संरक्षणाचे काय? : पत्रकारांना संरक्षणाच्या फक्त गप्पा; प्रत्यक्षात कार्यवाहीच होईना

वडवणी / प्रतिनिधी

डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य सदस्य तथा दैनिक 'वास्तव'चे संपादक जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणाऱ्या बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यावर कारवाई करत या धमकी मागील मास्टरमाईंडचा शोध घ्यावा, अशी मागणी मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणीच्यावतीने करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की, बीड येथील डिजिटल मीडियाचे राज्य सदस्य तथा दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी असलेल्या आगाव मॅडम नामक एका महिलेने दूरध्वनीवरून फोन करून धमकी दिली आहे. त्यांना उचलून आणण्याची भाषा केली आहे. या धमकीमुळे बीड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये खळबळ उडाली आहे. जितेंद्र सिरसाट हे मागील पंचवीस वर्षापासून बीड येथे पत्रकारिता करत आहेत. त्यांचे स्वत:चे वास्तव हे दैनिक असून त्या दैनिकाचे ते संपादक आहेत. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. गोरगरिबांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक वेळा आपल्या लेखणीतून आवाज उठवलेला आहे. शासन, प्रशासनाला भानावर आणण्यासाठी त्यांनी आपल्या लेखणीची धार कडक ठेवून प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. मात्र खरी पत्रकारिता करत असताना त्यांनी कधीही आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कोणालाही जाणीवपूर्वक त्रास दिलेला नाही. सामाजिक जीवनामध्ये ते अत्यंत सुस्वभावी व्यक्तिमत्व आहेत. प्रत्येक नागरिकांसोबत त्यांचे




अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कधीही कोणाला बोलताना मनमिळावू पणाने ते बोलतात. अशा हसतमुख असणाऱ्या पत्रकाराला शासकीय सेवेतील अधिकारी असलेल्या एका महिलेने दूरध्वनीवरून धमकी दिल्याचे ऑडिओ क्लिप ऐकायला मिळाली आहे. जितेंद्र सिरसाट यांना सदर महिला अर्वाच्च भाषेत बोलत असताना जितेंद्र सिरसाट त्यांना अत्यंत नम्रपणे बोलत आहेत. तरीही त्यांना धमकी देण्यात आली. जितेंद्र सिरसाट यांच्या सारख्या नामांकित पत्रकाराला जर धमकी मिळत असेल तर बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांना खूप मोठा धोका आहे. त्यामुळे या बाबीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांनी तात्काळ दखल घ्यावी आणि या बाबीची सखोल चौकशी करून या प्रकरणात नेमकं सदर महिलेच्या पडद्याआडून कोण कोण चेहरे आहेत याचा शोध घ्यावा अशी मागणी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिलराव वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार सुधाकर काका पोटभरे, मानवी हक्क अभियानचे वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले यांनी उपस्थित राहुन पाठिंबा दिला.

मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष सतीषराव सोनवणे, सचिव महेश सदरे. पत्रकार धम्मपाल डावरे, पत्रकार ओमप्रकाश साबळे, पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार हरी पवार, पत्रकार अतुल जाधव, पत्रकार विजय राऊत सह आदी पत्रकार यावेळी उपस्थित होते.

## आयपीएस नवनीत कॉंवत आता बीडचे नवे 'एसपी'

● पान १ वरून... नवनीत कांवत हे 2017 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. ते मूळचे राजस्थानचे असून त्यांचे वडील निवृत्त रेल्वे अधिकारी आहेत. कांवत यांचं सहावीपर्यंतचं शिक्षण मुरादाबादमध्ये झालं. सहावी ते 12 वी पर्यंतचं शिक्षण त्यांनी सैनिक स्कूल चित्तोडगढ इथे झालं. ते शाळेत एक सर्वसाधारण विद्यार्थी होते. वडिलांनी त्यांना एक आव्हान दिलं आणि नवनीत यांनी दहावी, 11 वी आणि 12 वी या तीन वर्षात सैनिक स्कूलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला होता. स्वत:वर विश्वास ठेवून त्यांनी दहावीत अव्वल क्रमांक पटकावला. 12 वीनंतर नवनीत यांनी आयआयटीमध्ये प्रवेश केला, तिथे त्यांनी बी टेक केलं. त्यांची आई शिक्षिका, वडील रेल्वेत होते, त्यांनी लहानपणापासून अधिकारी होण्याबाबत सल्ले दिले जात होते, पण नवनीत यांचा ओढा खासगी क्षेत्रात होता. नवनीत यांनी पदवी मिळवल्यानंतर त्यांनी सॉफ्टवेअर डिजाईन इंजिनिअर म्हणून एका खासगी कंपनीत नोकरी केली. यादरम्यान त्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरु केला. स्पर्धा परीक्षेसाठी ते दिल्लीत आले. तिथे त्यांनी अभ्यास करुन ते 2017 मध्ये आयपीस अधिकारी बनले.

## कोणाचा नंबर लागेल याचा नेम नाही! धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी

● पान १ वरून... खासदार पवार यांनी शनिवारी दुपारी मस्साजोग येथे सरपंच देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय यांनी आम्हाला न्याय हवा आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक झाली पाहिजे, अशी मागणी पवारांकडे केली. मुलगी वैभवी देशमुख म्हणाली, या प्रकरणातील मुख्य आरोपीसह सर्व आरोपींना अटक करून त्यांना कठोर शिक्षा व्हायला हवी. तुम्ही घाबरू नका. वेळ पडल्यास तुम्हाला पोलिस बंदोबस्त देऊ. स्व. संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यायला तयार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी ते शनिवारी येथे आले होते. या प्रकरणात आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींना टार्गेट केले जाणार आहे. त्यामुळे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे. या गुन्ह्याचा मास्टरमाइंड वाल्मीक कराड आहे, आता रडून भागणार नाही. खंडणीमध्ये कराड यांचे नाव टाकले आहे, असे आमदार संदीप क्षीरसागर यांनी सांगितले





## सेंट अँन्स स्कुलच्या विद्यार्थ्यांनी केली भारतीय संस्कृतीची उजळणी; चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने; स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

मूर्तिजापूर : अहेम रजा

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उदात्त हेतूने शाळेच्या वतीने दरवर्षी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येत असून विद्यार्थ्यांनी आपल्यातील कला सादर करतांना भारतीय संस्कृतीचे जतन करून संगणक आणि मोबाईलच्या युगात विसर पडत चाललेल्या भारतीय संस्कृतीची उजळणी केली.


कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या व कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दिप प्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागत करून स्वागत गीताने करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयात प्राविण्य प्राप्त केले त्याबद्दल त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर संगणकाच्या युगात व मोबाईलच्या अति वापरामुळे नागरिकांमध्ये विसर पडत चाललेल्या भारतीय संस्कृतीची "आपली संस्कृती आपला वारसा" या शिर्षकाखाली पथनाट्य सादर करत उत्तमपणे इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी उजळणी करत अखंड भारताची साक्ष दिली. त्यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पंजाबी गीतावर नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी संजय मोरे, प्रमुख अतिथी म्हणून दिवाणी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ए.जी.तांबोळी, न्यायाधीश आर.आर. पाकडे तर विशेष अतिथी म्हणून मोहन गावंडे, सरपंच, सांगवामेळ, प्रगती पांडे, सरपंच, कुरणखेड, विलास गवई, सरपंच, सिरसो यांच्यासह मुख्याध्यापिका सुचिता, व्यवस्थापक मर्लिन, पंडित पुरोहित ऐ जे जोसेफ इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा मेहकरे यांनी आभार प्रदर्शन अंजली चरडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक ज्ञानेश ताले यांच्यासह इतर शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

## सौरकुंपनची डॉ. श्यामाप्रसाद जन-वन विकास अनुदानित योजना लागु करा : शिवराम राऊत

● पान ४ वरून... भूईमुग या जीवनिवश्यक पीकाचा पेराच करण्याचे अनेक शेतकरी टाळू लागल्याने हे पीक संपुष्टात येण्याचा धोका विचारात घेऊन शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने सौरकुंपनची डॉ. श्यामाप्रसाद जन–वन विकास योजना लागु करावी अशी मागणी करण्याचे निश्चीत झाले आहे. हि योजना शासनाच्या वन विभागाच्या वतीने केवळ वन–जंगलाच्या लगतच्या गावासाठीच दि.२५ में २०२२ शासन निर्णय क्र.डब्ल्यु.एल.पी.१२२१/प्र.क्र.३४०/फ–१ नुसार सौरकुंपन समाविष्ट केले आहे. तरी यामध्ये केवळ वनाभोवतालची गावे न घेता ज्या ठिकाणी डुकरे, हरणे व इतर वन्य प्राण्यापासुन पीक नासाडी होते या शेतक–यांना लाभ देण्याची बाब समाविष्ट करणे आवश्यक आहे. करिता पुढील काळात कृषिमंडळाच्या वतीने या पूर्वीच २०२३ मध्ये तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन केले होते. तरी आता, जिल्हाधिकारी, कृषिअधिक्षक, जिल्हा वन अधिकारी, कृषिआयुक्त महा.राज्य पुणे व जिल्हयातील सर्व आमदार महोदयांना निवेदने करून हि योजना बीड जिल्ह्यातील भुईमुग, मका, चंदन, औषधी वनस्पती उत्पादक शेतक–यांना लागु करावी यासाठी प्रयत्न करणार आहेत. असे शिवश्री कृषि मंडळाचे अध्यक्ष शिवराम राऊत, उपाध्यक्ष माऊली शिंदे, विश्वाभर शिंदे, शिवनारायण दुधाळ, रामेश्वर पांडुळे, श्रीनिवास राऊत व उपस्थित पदाधिकारी, शेतकरी यांच्या बैठकित निश्चित झाले आहे.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष





# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये आनंद मेळावा

विहामांडवा / इम्तीयाज शेख

पैठण तालुक्यातील विहामांडवा- येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत दि 21 डिसेंबर शनिवार रोजी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा झाला, विद्यार्थ्यांना शालेय जिवनासोबतच व्यवहारीक ज्ञान देखील मिळावे, म्हणून आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी १५० स्टॉल उभारले होते. दिवसभरात विविध पदार्थांच्या विक्रीतून १७ हजार ५०० रुपयांची कमाई केली. आनंद नगरी मेळाव्याचे सरपंच, व्यापारी महासंघ, पालकवर्ग, गावातील नागरिक, पत्रकार बांधव यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यवहारीक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते. यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा म्हणून जिल्हा परिषद शाळेत आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात शाळेतील तब्बल 200 हुन अधिकाहुन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी घरुनच साहित्य बनवून आणुन शालेय आवारात स्टॉल लावले. विद्यार्थी खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होते. या मेळाव्याला एकप्रकारे बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. यावेळी विहामांडवा केंद्र प्रमुख शेळके सर, जिल्हा परिषद प्रशालेच्या मुख्याध्यापिका आशा शिंदे, मुख्याध्यापक रायभान गायकवाड, शिक्षक बाबासाहेब येळे, तसेच शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर भेट दिली.

## मुंबई विमानतळावर तब्बल 11 कोटीहून अधिक किंमतीचे अमली पदार्थ जप्त

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर परदेशातून आलेल्या एका प्रवाशाकडून एक दोन नाही तर तब्बल 11 कोटीहून अधिक किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. कस्टम विभागाकडून ही कारवाई करण्यात आलीय. बँकॉकहून येणाया एका प्रवाशाची चौकशी केली असता, त्याच्याकडं अंदाजे 11.32 कोटी रुपयांचे अमली पदार्थ सापडल्याची माहिती, एका अधिका-यानं दिलीय.

एकाला अटक : मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर परदेशातून करोडो रुपयांचे अमली पदार्थ येणार असल्याची माहिती गुप्तचर विभागाकडून कस्टम विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे प्रवाशाचे प्रोइल तयार करून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान, अधिकायांनी सदरील प्रवाशाच्या ट्रॉली बॅगमध्ये व्हॅक्यूम- सीलबंद प्लास्टिकच्या पाऊचमध्ये लपवून ठेवलेले अमली पदार्थ जप्त केला. त्यानंतर संबंधित प्रवाशाला अटक करण्यात आली. अधिकायांनी दिलेल्या माहितीनुसार, 'हायड्रोपोनिक मारिजुआना' श्रेणीत येणारे हे अमली पदार्थ उच्च दर्जाचे गांजाचे स्वरूप आहे. हा गांजा बाजारात एक टॉप कॉलिटीचा माल म्हणून ओळखला जातो. याचे ग्राहक देखील तशा प्रकारचे असतात.

# वाढती थंडी ठरतेय गहू हरभरासह आंबा चिंच आदींना पोषक ; शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त!







■ **माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल होऊन थंडीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने रब्बी हंगामातील गहू तूर, हरभरा पिका सह आंबा पेरू, चिंच आदींचे या वर्षी विक्रमी उत्पादन होणार असल्याचे बोलले जात असल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे.

तालुक्यातील परिसरात ढगाळ वातावरण निर्माण होऊन वातावरणातील थंडी कमी झाली होती. रब्बी हंगामातील पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेले थंडी पुरेशा प्रमाणात पडत नसल्याने गहू, हरभरा, कांदा, ज्वारी, मका, उस आदी पिकां सह आंबा, चिंच, मोसंबी, पेरू उत्पादन शेतकरी चिंताग्रस्त झाला होता.

मागील चार ते पाच दिवसांपासून परिसरात थंडीचा कडाका वाढला आहे. थंडीचा सरासरी पारा घटत आहे. दिवसा आणि रात्री गार वाऱ्यामुळे माजलगाव तालुक्यात गारठाला आहे. वाढलेल्या थंडीमुळे गहू हरभरा, ज्वारी, गका, कांदा, आंबा, पेरू, चिंच या फळ पिकासाठी फायदेशीर ठरत आहे.

सध्याच्या वाढत्या थंडीमुळे शेतकऱ्यांची गहू पेरणीसाठी लगबग वाढली आहे. ऊस तुटून गेलेले क्षेत्र आणि कपाशी उपटलेल्या शेतामध्ये तसेच ऊस पिकामध्ये आंतरपीक म्हणूनही शेतकऱ्यांकडून गव्हाची पेरणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

सध्या थंडीचा कडाका वाढला आहे. मात्र, काही दिवसांपूर्वी पडलेल्या ढगाळ वातावरणामुळे फळ बागांसह फूल उत्पादकांना फटका बसला होता. माजलगाव तालुक्यात पपई, मोसंबी, डाळिंब, पेरू, आंबा, यासह आदी फळ पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र, काही दिवसांपूर्वी ढगाळ वातावरण पडल्याने यातील काही फळपिके कवडीमोल भावाने विकावे लागत आहे.

परिणामी फळउत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

यासह फूल उत्पादकांनाही थंडीचा फटका बसत असून, या उलट फुले उमलण्याच्या प्रमाणात घट झाल्याने फूल उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत.

### सर्वच पिकं छान बहरली आहे



■ मागच्या काही वर्षा पासून हवामानात झालेला बदल आणि नैसर्गिक अनियमितात या मुळे गहू हरभरा तूर आदी पिकां खूप मेहनत करून पण चांगला उतार मिळत नसे मात्र या वेळी हे थंडीचे पूरक वातावरण सर्व पिकं आणि फळे यांना खूप लाभ दायक ठरणार असल्याने सर्वच पिकं छान बहरली आहेत त्या मुळे माझ्या सह अनेक शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत

■ **सुभाष कोरडे**, शेतकरी शृंगारवाडी.

# श्री मंगलनाथ मल्टिस्टेट ची नवीन वर्षाची दिनदर्शिका प्रकाशित

माजलगाव / प्रतिनिधी : काल दि २० डिसेंबर रोजी येथील सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न झाला. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थान चे मठाधीपती श्री.ष.ब.१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते दिनदर्शिका २०२५ चे लोक प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री आर.जी कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेला २५ वर्ष पूर्ण झाली आहेत सभासदांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती व्हावी व दिनदर्शिकेचा देखील लाभ सभासदांना घेता यावा करीता संस्था गेली २५ वर्षांपासून अखंडित परंपरागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करत आहे. त्याच बरोबर सर्व सभासदांना सदरील दिनदर्शिका घरपोच दिली जाणार आहे. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य



प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांनी वचन, निष्ठा व समाजसेवा या घालून दिलेल्या तीन बंधननावरती संस्था कार्य करत असल्यामुळे संस्थेला आज यशस्वी २५ वर्ष पूर्ण झाली. त्यांचा आशीवार्द संस्थेच्या सदैव पाठीशी आहे.

संस्थेचे आज रोजी ५५० कोटी पेक्षा अधिक व्यवसाय असून ३११ कोटी ठेवी व २३२ कोटी पेक्षा अधिक कर्ज वाटप आहे त्यामध्ये १२५ कोटी पेक्षा अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप आहे व एकूण कर्जाच्या ९९.०८ टक्के कर्ज हे सुरक्षित असल्यामुळे सभासदांच्या ठेवी या सुरक्षित आहेत.

संस्थेने स्थापनेपासून केवळ व्यवसाय वाढ व अधिकाधिक नफा मिळवणे हे उद्दिष्ट न ठेवता सभासद सेवा व सभासदांच्या ठेवींना सुरक्षितता या बाबींना नेहमीच प्राधान्य दिले आहे यापुढे देखील संस्था सुरक्षिततेला प्राध्यान्य देऊनच काम करणार आहे असे आश्वासन दिले.

याप्रसंगी संस्थेचे संचालक श्री सुधाकर गुळवे, व्यवस्थापकीय संचालक अँड.रवींद्र कानडे संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक श्री भिसे दत्तात्रय, श्री नारायण शेंडगे, व वरिष्ठ अधिकारी श्री सचिन कैलासे, राहुल काटकर, अमोल पांडे, विकास पाटील इत्यादी उपस्थित होते.



# शाहांच्या तोंडून भाजपचा आंबेडकर द्वेष समोर आला : अजिंक्य चांदणे

## आक्षेपार्ह वक्तव्याचा बीडमध्ये अमित शाह यांचा पुतळा जाळून निषेध

बीड : भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आंबेडकर द्वेष अमित शहांच्या तोंडून देशाच्यासमोर आला. अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अजिंक्य चांदणे यांनी व्यक्त केली. दरम्यान परभणी येथील सोमवानाथ सुर्यवंशी या युवकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे शुक्रवार (२० डिसेंबर) रोजी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध नोंदविण्यात आला. यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा ही आंबेडकर द्वेषी असल्याचे देशाला आता माहीत झाले आहे. देशाच्या सर्वोच्च सभागृहात संघ प्रणित भाजपचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानजनक भाष्य केले होते. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा अवघ्या देशात निषेध नोंदविला जात आहे. अमित शहा संविधानामुळे गृहमंत्री झालेत, असे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल एवढा तिरस्कार का? त्यामुळे अमित शहा यांना त्या पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी डागळली. यावेळी सुभाष लोनके, सुनिल पाटोळे, बाळासाहेब दोडके, यांच्यासह डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिंद्रुड येथे कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात येणार नाही ;बंदला वैतागलेल्या व्यापाऱ्यांचा एकमुखी ठराव

माजलगाव / प्रतिनिधी : वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी पुरते वैतागले आहेत. यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी एकत्रित येऊन बैठक घेतली. यापुढे काहीही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात आला तरी आपापली दुकाने चालू ठेवण्याचा एकमुखी निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग व्यापारासाठी पहिली पसंती देतात. भुसार, कृषी उत्पादने, बांधकाम साहित्या पासून ते सोन्याचांदीची खरेदी - विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत लोकप्रिय आहे.



मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. यालाच वैतागलेल्या दिंद्रुड येथील सर्व व्यापाऱ्यांनी येथील शिवाजीनगर भागात शनिवारी सकाळी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत यापुढे कुठल्याही परिस्थितीत बंद पाळण्यात येणार नसल्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला. येथील प्रतिष्ठित नागरिक युवराज ठोंबरे, बंडूजी खांडेकर, प्रदीप ठोंबरे, संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापारी महासंघाची स्थापना करण्यात आली.

संघाच्या पदाधिकाऱ्यांची यादी यावेळी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व्यापारी महासंघ दिंद्रुड ही संघटना काम करणार आहे. व्यापारी महासंघाचे अध्यक्षपदी उद्योजक प्रकाश ठोंबरे, उपाध्यक्ष गणेश मायकर व परमेश्वर ठोंबरे, सचिव गणेश काटकर, कोषाध्यक्ष पांडुरंग झोडगे, सहसचिव संजय बडे, सदस्य पदी पद्माकर मुंडे, शहाजी काशीद, सय्यद शायक, सुरेश पासंगे, महेश ठोंबरे, मुन्ना ठोंबरे यांची एक मुखाने निवड करण्यात आली. यावेळी शेकडो व्यापारी उपस्थित होते.

# सौरकुंपनची डॉ. श्यामाप्रसाद जन-वन विकास अनुदानित योजना लागु करा : शिवराम राऊत

**शिरूर तालुक्यात रानडुकरांच्या वाढत्या त्रासामुळे शिवश्री कृषि मंडळ सर्व आमदारांना देणार निवेदन**

शिरूर : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील रानडुकरे, हरणा पासुन मका, भूईमुग, ज्वारी, गहु, पीकांची होणारी नासाडी मुळे अनेक वर्षा पासुन शेतकरी त्रस्त आहेत. भुईमुग, मका, लागवडीच्या दिवसा पासुनच या प्राण्यांचा त्रास सुरू होतो. अगदी जमीन नांगरलेल्या प्रमाणे बियाणे, रोपटे, उभी मका, ज्वारी, जमीनदोस्त करून नासाडी



वाढल्याने तालुक्यातील प्रत्येक गावातील भूईमुग उत्पादक शेतकरी वैतागून डुकरांच्या बचावासाठी, शेताभोवताली निकामी साड्या गुंडाळणे, तात्पुरती तार लावणे, बुजगावणे उभारणे, आवाजाची यंत्रे वापरणे, रात्रीची राखण करणे, तारेला करंट लावणे अशें उपाय करून देखील डुकरांचा त्रास चालूच आसल्याने शेतीला तार संरक्षण करणे ही खर्चीक बाब आवश्यक झाल्याने ● पान ३ वर...

**कौतुकाचा वर्षाव** ● परिषदेत देशभरातील सीबीएसई संलग्रित १०० हून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता

# सिंदफणा स्कूलचे दिल्ली येथील सीबीएसई किशोरवयीन शिखर परिषदेत उत्कृष्ट यश

**माजलगाव : अरविंद ओव्हाळ :** विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलने दिल्ली येथे आयोजित केलेल्या सीबीएसईच्या किशोरवयीन शिखर परिषदेत नुक्कड नाटक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून मोठे यश संपादन केले आहे. शाळेने सलग तिसऱ्या वर्षी किशोरवयीन परिषदेत घवघवीत यश संपादन केल्यामुळे शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, दिनांक २० व २१ डिसेंबर रोजी दिल्लीतील बाल भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत देशभरातील सीबीएसई संलग्नित १०० हून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता. या परिषदेत शाळेचे प्रतिनिधित्व इयत्ता नववीतील विद्यार्थी रोनक वारकरी, धनराज बजाज, भार्गवी गुंजकर, प्रांजल नरवडे, यशश्री गायकवाड यांनी केले. त्यांच्यासोबत सहशिक्षिका सुनिता सुरवसे आणि उपप्राचार्य राहुल कदम उपस्थित होते. जीवन कौशल्य, मानसिक आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण या विषयांवर आधारित या परिषदेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नृत्य, चित्रकला, प्रदर्शन, भाषण, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रोनक वारकरी या विद्यार्थ्याने नुक्कड नाटक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले.

या परिषदे दरम्यान विद्यार्थ्यांना सीबीएसईचे शैक्षणिक संचालक जोसेफ एम्माऊनेल, मनोज श्रीवास्तव, इंडिया टी.व्ही.चे अध्यक्ष रजतजी शर्मा, मंत्रालयाचे केंद्रीय






आरोग्य अधिकारी आणि एक्स्प्रेशन इंडियाचे संचालक डॉ. जितेंद्र नागपाल यांच्यासारख्या नामवंत व्यक्तींचे मौलिक मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, उपाध्यक्ष विरेन सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, समन्वयक निला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव यांच्यासह सहभागी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

## ओबीसी नेते छगन भुजबळ मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत?

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा शपथविधी सोहळा रविवारी (दि. 15) पार पडला. यामध्ये 33 कॅबिनेट तर 6 राज्य मंत्र्यांचा समावेश आहेत. भाजपमधील 19, शिंदेंच्या शिवसेनेतील 11 तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील 9 नेत्यांना मंत्रिपदाची संधी घेतली. विशेष म्हणजे या मंत्रिमंडळात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळांना डावलण्यात आल्याने ते कमालीचे नाराज झाले आहेत. छगन भुजबळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर थेट हल्लाबोल केलाय. छगन भुजबळ हे नागपूरमध्ये सुरु असलेले हिवाळी अधिवेशन सोडून नाशिकला दाखल झाले. नाशिकमध्ये समता परिषदेच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर शुक्रवारी ते मुंबईत पोहोचले. आज आणि उद्या ते राज्यभरातील ओबीसी नेत्यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे छगन भुजबळ मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे का? याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार होताच छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली होती. यानंतर ते तातडीने नाशिकला रवाना झाले होते. जहाँ नहीं चैना, वहाँ नहीं रहना, असे सूचक वक्तव्य त्यांनी केले होते. छगन भुजबळांच्या नाराजीचे पडसाद राज्यभरात उमटले. अजित पवारांच्या बारामतीतील निवासस्थानाबाहेर देखील ओबीसी समाजाकडून आंदोलन करण्यात आले. नाशिकमधील कार्यकर्त्यांनी राजीनामे देण्याचा इशारा दिला होता. नाशिक आणि येवल्यात समर्थकांसोबत झालेल्या बैठकीत छगन भुजबळ यांनी अजित पवारांवर थेट हल्लाबोल केला होता. वाह रे, दादाचा वादा, कसला वादा अन् कसला दादा, असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार प्रुल्ल पटेल आणि खासदार सुनील तटकरे हे तिघेच पक्षाचा निर्णय घेतात.